Movie: Mumbaicha Dabbewala
Year: 2007

Song: Galat Hasla Kaljaat Ghusala
Lyricist: Anant Jadhav

गालात हसला काळजात घुसला
मनात कायमचा ठसला
होता मनात कायमचा ठसला
नजर लागली याला कुणाची
का हा मड्डमच्या नादात फसला
नजर लागली याला कुणाची
का हा मड्डमच्या नादात फसला

कुठे रूपाची राणी
कुठे भटक भवानी
तिच्या प्रेमात जीव माझा गुतला
तिच्या प्रेमात जीव माझा गुतला

ओळख साजणे मनामध्ये
का हा नागोबा फुसफुसला
ओळख साजणे मनामध्ये
का हा नागोबा फुसफुसला

जात पुरूषाची लबाड खोटी
लागते पैसेवाल्यांच्या पाठी
पुरूषाविना नार एकटी गं
जशी बोटाविना अंगठी

जात पुरूषाची लबाड खोटी
लागते पैसेवाल्यांच्या पाठी
पुरूषाविना नार एकटी गं
जशी बोटाविना अंगठी
खिल्लारी खोंड मर्दानी पिंड
मनात कायमचा ठसला

होता मनात कायमचा ठसला
नजर लागली याला कुणाची
का हा मड्डमच्या नादात फसला
नजर लागली याला कुणाची
का हा मड्डमच्या नादात फसला

मारू नको घडी घडी टोमणा
नामा एम डी ला समजून घेना
काय बाईनं केला जादूटोणा रं
झाला लैलाचा मजनू दिवाणा

मारू नको घडी घडी टोमणा
नामा एम डी ला समजून घेना
काय बाईनं केला जादूटोणा रं
झाला लैलाचा मजनू दिवाणा
करू नको राग पोरी विचारानं वाग
का गं नाकाला कांदा हा झोंबला
का गं नाकाला कांदा हा झोंबला

ओळख साजणे मनामध्ये
का हा नागोबा फुसफुसला
ओळख साजणे मनामध्ये
का हा नागोबा फुसफुसला

ही लॉटरी लाखाची सोडत
नाही विकत तू गेलास उडत
आगं चेष्टा केली मी तुझी गं
करू नको तू माझी हजामत
ही लॉटरी लाखाची सोडत

Literacy for a Billion

नाही विकत तू गेलास उडत
आगं चेष्टा केली मी तुझी गं
करू नको तू माझी हजामत

दिलाचा दिलदार जन्माचा जोडीदार
कव्हाचं होता मी हेरला
तुला कव्हाचं होता मी हेरला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*